# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना कमांक २००७/(३२२/०७) विशि–५ महाराष्ट्र अधिनियम १९९४(१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापीत राज्य विद्यापीठ

**( परीक्षा विभाग )**

एम.आय.डी.सी.रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली—४४२६०५

फोन नंबर ०७१३२—२२३३५२ ई मेल आय डी coegondwana@gmail.com

**जा.क्र.गों.वि./परीक्षा विभाग/567/२०१६** **दि. ०३/०३/२०१६**

## अधिसुचना

## उन्हाळी २०१६ च्या परीक्षा आवेदन पत्र स्विकारण्याबाबत

**संदर्भ १) जा. क्र./गों. वि./परीक्षा विभाग/३५५४/२०१५ दिनांक १४/१२/२०१५**

**संदर्भ.२) जा. क्र/गों. वि./परीक्षा विभाग/५०९/२०१६ दिनांक २९/०२/२०१६**

उपरोक्त संदर्भान्वये गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयाच्या प्राचार्यांना तथा संबंधितांना सूचित करण्यात येते कि, **उन्हाळी २०१६** च्या परीक्षेकरीता Online परीक्षा आवेदनपत्र स्विकारण्याची व परीक्षा शुल्क स्विकारण्याची अंतिम दिनांक **१४/०३/२०१६** पर्यंत वाढविण्यात आलेली असून महाविद्यालयाने परीक्षा शुल्क विवरण पत्र, **दिनांक १२/०३/२०१६ च्या डी. डी. सह.**,Exam Form Submission Report व इतर दस्ताऐवज प्राचार्याच्या स्वाक्षरीसह प्रमाणीत करुन विद्यापीठात **दिनांक १४/०३/२०१६ ला सायंकाळी ५.३० पर्यंत** सादर करावे. त्यानंतर आलेले परीक्षा आवेदन पत्र कोणत्याही परीस्थितीत स्विकारण्यात येणार नाही. करीता नोंद घ्यावी.

तसेच ज्या महाविद्यालयांत खरीप हंगामातील हंगामी ५० पैसे पेक्षा कमी आणेवारी असलेल्या गावातील शासन नियमाप्रमाणे पात्र असलेल्या विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदन पत्र परीक्षा शुल्क न घेता स्विकारण्यात यावे, संलग्नित प्रमाणपत्र प्रमाणित करून द्यावे आणि जा.क्र./गों.विं./परीक्षा विभाग/४५४/२०१६, दि.२०/०२/२०१६ व जा.क्र./गों.विं./परीक्षा विभाग/४६६(A)/२०१६ दि.२२/०२/२०१६ च्या पत्रानुसार परीक्षा आवेदनपत्र, संबंधीत प्रपत्र, प्रमाणपत्र आणि संबंधीत आवश्यक दस्ताऐवज हे विद्यापीठात उपरोक्तप्रमाणे विहीत मुदतीत सादर करावे. तसेच ज्या महाविद्यालयात ५०पैसे पेक्षा कमी आणेवारी असलेल्या गावातील विद्यार्थी नसेल अश्या महाविद्यालयाने सोबत संलग्नित हमीपत्र महाविद्यालयाच्या कवरींग लेटरहेडवर प्राचार्यांच्या सही व शिक्क्यासह पाठविण्यात यावे. करीता नोंद घ्यावी.

मा. परीक्षा नियंत्रक
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, यादीत दर्शविलेले परिक्षार्थी........ ........................या महाविद्यालयात नियमित विद्यार्थी असुन ते गोंडवाना विद्यापीठाच्या उन्हाळी २०१६ च्या परिक्षेला बसलेले आहेत. ते ई.बी.सी. धारक असुन टंचाईग्रस्त गावातील रहिवासी आहेत. म्हणुन ते परीक्षा फी ची प्रतिपुर्ती करण्यास पात्र आहेत.

विभागीय शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपूर विभाग, नागपूर अशा विद्यार्थ्यांची माहिती प्राप्त झाल्यानंतर जे विद्यार्थी सवलतीस पात्र ठरत असतील त्यांच्या परीक्षा फी ची प्रतिपूर्ती करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या रक्कमेचे डिमांड ड्राफ्ट तयार करून ते गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली कडे “प्रतिपूर्तीची रक्कम” म्हणुन पाठवावेत.

**प्राचार्यांची सही व शिक्का**

# हमीपत्र

(ज्या महाविद्यालयात शासन पुरपत्रक क्रमांक–५२१५/प्रक्र३७४/१५मशि–२,दि.०७ डिसेंबर २०१५ च्या नुसार ५० पैसेपेक्षा कमी आणेवारी असलेल्या गावातील परीक्षा शुल्क माफी मिळण्यास पात्र विद्यार्थी नाहीत)

प्रमाणित करण्यात येते की, ........................................................................ येथे शैक्षणिक सत्र २०१५–१६ च्या खरीप हंगामातील हंगामी ५० पैसेपेक्षा कमी आणेवारी असलेल्या गावांच्या यादीत दर्शविलेल्या आणि नियमित प्रवेश घेतलेल्या यादीत कोणतेही परिक्षार्थी नसुन उन्हाळी २०१६ परीक्षेकरीता सदर यादीच्या गावातील विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदन अर्ज प्राप्त झालेले नाहीत.

यास्तव दुष्काळग्रस्त भागातील अशा कोणत्याही विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क महाविद्यालयाने स्विकारलेले नाहीत, सदर यादीतील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क स्विकारल्यास सदर शुल्क परत करण्याची जबाबदारी महाविद्यालयाची राहील, नियमित विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदन अर्ज दर्शविलेल्या यादीशी पडताळणी करूनच स्विकारण्यात आलेले आहे, ५० पैसे पेक्षा कमी आणेवारी असलेल्या गावातील एकही विद्यार्थी बाधीत नाहीत.

प्राचार्यांची सही व शिक्का